
साप्ताहिक
# गोदावरी परिवार
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490
सवलतीचा पोस्ट रजि.नं.-JAL/120/2022-24




* वर्ष २५ वे * अंक ४५ * सोमवार ०४/११/२०२४ * डाक ०६/११/२०२४ * पाने - ४ * किंमत २ रुपये
* year 25 * issue 45 * monday : 04 / 11 / 2024 * post Dt. 06/ 11 / 2024 * pages - 4 * price 2 Rs.

## इसबवर त्वचाविकार विभागात होतील उपचार

**जळगाव – त्वचेवर कोरडेपणा, खवले, खाज, पुरळ, पाणी येणे, इत्यादी त्रासाला इसब म्हटले जाते. इसब हा सामान्यत: एखादी अतिसंवेदनशीलता किंवा अलर्जी जिच्यामुळे दाह होतो त्याच्या परिणामी होतो.**

दाहामुळे त्वचा ही लाल, खाजणारी आणि खवलेयुक्त होते. इसबामुळे त्वचा लाल होते, कोरडी पडते आणि तिच्यावर लाल चट्टे उठतात. उष्णता, तणाव, किंवा खाजवण्यामुळं जखमा झाल्यानं तिथला कंड अधिक वाढतो. इसब लहान बाळ आणि युवा मुलांमधे ते सहसा आढळते. तथापि, वयस्कर मुले आणि प्रौढांनादेखील इसबचा त्रास होऊ शकतो. गुडघ्यांच्या मागे, कोपरांचा कोन आणि मनगटे, मानेवर, घोट्यांवर आणि पायांवर ब-याचदा चट्टे उठतात. बालकांमधे हे चट्टे गालांवर पुरळ येण्याव्दारे सुरु झाल्याचे दिसून येते. काही महिन्यांनी हे पुरळ हात आणि पायांवर उठतात.दमा किवा उच्च ताप येण्याचा इतिहास असलेल्या लोकांमधे इसब हे अधिक सहजपणे आढळते. इसबाचा कौटुंबिक इतिहास, पिवळा ताप किंवा अन्य श्वसनाच्या अलर्जी असणा-या लोकांमधे देखील इसबाचे प्रमाण अधिक असते.

**डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या त्वचा विकार विभागात इसब या आजारावर उपचाराची सुविधा उपलब्ध आहे.**

# खेती शिरपूरच्या नवजात शिशुला मिळाले जीवदान

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या एनआयसीयूत यशस्वी उपचार

**जळगाव – जन्मत:च जंतुसंसर्ग आणि श्वास घ्यायला होणाऱ्या त्रासामुळे जीवास धोका निर्माण झालेल्या नवजात शिशुवर वेळीच उपचार झाल्याने त्याला जीवदान मिळाल्याचा प्रत्यय डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील शिशु तज्ज्ञांमुळे आला.**

याबाबत माहिती अशी की, अकोला जिल्ह्यातील पातूर येथे डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातर्फे आरोग्य शिबीर घेण्यात आले होते. या शिबीरात खेती शिरपूर येथील रहिवासी असलेले नबी खान यांच्या पत्नीची प्रसूती होऊन झालेल्या नवजात शिशुची तपासणी करण्यात आली होती. यात नवजात शिशुच्या शरीरात मोठ्या प्रमाणावर जंतुसंसर्ग झाला होता. तसेच त्याला श्वास घ्यायला देखिल त्रास होत होता.

त्याला तातडीने डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या नवजात शिशु विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले.



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

याठिकाणी नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. सुयोग तन्नीरवार यांनी शिशुची तपासणी केली असता जंतुसंसर्गाचे निदान करण्यात आले. उपचारामुळे जंतुसंसर्ग कमी झाला आणि त्याला श्वास देखिल घेता येऊ लागला. अचूक निदान आणि वेळीच झालेल्या उपचारामुळे नवजात शिशुला जणू जीवदानच मिळाले.

> प्रसूती झाल्यानंतर जन्मलेल्या शिशुची संपूर्ण आरोग्य तपासणी होणे आवश्यक असते. जेणेकरून शिशुची प्रकृती सुदृढ आहे की नाही? याबाबतची माहिती मिळते. नवजात शिशुला जंतुसंसर्गापासून दूर ठेवणे हे अत्यंत काळजीपूर्वक असले पाहीजे. अन्यथा शिशुला जंतुसंसर्ग झाल्यास तो जीवावरही बेतू शकतो. त्यासाठी अचूक तपासणी आणि निदान होणे गरजेचे आहे.
>
> 
>
> डॉ.ओमश्री गुडे
> निवासी डॉक्टर


# ३० वर्षीय रूग्णाच्या पायावर स्कीन ग्राफ्टींगद्वारे उपचार

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील शल्यचिकीत्सकांचे यश

**जळगाव – पायाला मार लागून दुखापत झालेल्या ३० वर्षीय रूग्णाच्या पायावर स्कीन ग्राफ्टींगद्वारे उपचार करण्यात डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील शल्यचिकीत्सकांना यश आले आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, संदीप बावस्कर (वय ३०) या तरूणाच्या उजव्या पायाच्या गुडघ्याखाली मार लागला होता. त्यामुळे जखम झाली होती. पाच ते सहा महिने होऊनही ही जखम सुधरत नव्हती. अशा परिस्थीतीत हा तरूण उपचारासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात भरती झाला. याठिकाणी शल्यचिकीत्सक डॉ. सय्यद मुसब यांनी त्याची तपासणी केली. सुरूवातीला पायाची जखम बघुन कल्चर सेन्सेटीव्हीटीची तपासणी करण्यात आली. यात पायाच्या जखमेत जंतुसंसर्ग झाल्याचे दिसून आले. सुरूवातीचे पाच ते सहा दिवस एंटीबायोटीकद्वारे उपचार करण्यात आले.

त्यानंतर डाव्या पायाच्या मांडीची चामडी काढून ती उजव्या पायाच्या गुडघ्याखाली ज्याठिकाणी जखम झाली होती तेथे लावून कच्चे प्लास्टर करण्यात आले. त्यानंतर दर तीन ते चार दिवसाआड ड्रेसींग करून जखमेची काळजी घेण्यात आली. १५ दिवसानंतर स्कीन ग्राफ्टींग यशस्वी झाल्याने संदीप बावस्कर या रूग्णाने डॉक्टरांचे आभार मानले.




हा संपूर्ण उपचार महात्मा फुले आरोग्य योजनेंतर्गत मोफत करण्यात आला. तसेच उपचारासाठी शल्यचिकीत्सक डॉ. सय्यद मुसब, डॉ. सेजोल कश्यप, डॉ. अपुर्वा गवई, डॉ. आशिष बावनकर यांनी परिश्रम घेतले.

# मुत्रपिंडाच्या आजाराचे डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात अचूक निदान

**जळगाव – अलिकडच्या काळात मृत्यूच्या १० प्रमुख कारणांपैकी एक कारण मूत्रपिंडाच्या आजाराचं असून हा आजार ७ व्या क्रमांकावर आहे. दरवर्षी २-२.५ लाख लोक मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त असतात. मुत्रपिंडाचे आजाराचे अचूक निदान आणि उपचार डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात उपलब्ध आहेत.**

मूत्रपिंडांशी संबंधित आजार सुरुवातीच्या टप्प्यात समजून येत नाही. मात्र गंभीर समस्या निर्माण झाल्यावर हा आजार आहे हे दिसून येते.मूत्रपिंड म्हणजेच किडनी हा शरीराच्या ओटीपोटात असलेला सर्वात महत्वाच्या अवयवांपैकी एक आहे. आपल्या शरीरातील कचरा मूत्राद्वारे शरीराच्या बाहेर फेकणे हे याचं मुख्य कार्य असते. मूत्रपिंड रक्तामध्ये आढळणारे टाकाऊ पदार्थ, शरीरासाठी अनावश्यक असलेले अतिरिक्त खनिजे



लघवीवाटे बाहेर काढून टाकते आणि शुद्ध रक्त संपूर्ण शरीरात वितरीत करते. परंतु आपली जीवनशैली, आहार, सवयी, आनुवंशिक समस्या, औषधाच्या गोळ्या घेणं आणि आरोग्याच्या इतर विकारांसह विविध कारणांमुळे या अवयवाच्या कार्यात अडथळा येतो. मळमळ आणि उलटी, भूक न लागणे, पाय आणि घोट्याला सूज, धाप लागणे, झोपायला त्रास होतो, लघवी कमी-जास्त होणे अशी मुत्रपिंड विकाराची लक्षणे आहेत.

# डॉ.गुणवंतराव सरोदे आयुर्वेद रूग्णालयात ४५० बालकांवर सुवर्णप्राशन संस्कार

## गोदावरी फाउंडेशन संचलित संस्थेचा उपक्रम ; बालकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**जळगाव – पुष्य नक्षत्राच्या मुहूर्तावर येथील गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद रूग्णालयात आयोजित उपक्रमात ४५० बालकांवर सुवर्णप्राशन संस्कार करण्यात आले. या उपक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.**

गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालयातर्फे आयोजित सुवर्णप्राशन संस्कार या कार्यक्रमाचा शुभारंभ संस्थेचे चेअरमन तथा माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते बालकाला सुवर्णप्राशन देऊन करण्यात आला. यावेळी आयुर्वेद महाविद्यालयाचे डीन डॉ. हर्षल बोरोले, डॉ. निखील चौधरी, डॉ. कोमल खांडरे, डॉ. साजीया खान, डॉ. मुकेश चौधरी, डॉ. पालवी चौधरी, डॉ. मयुरी चौधरी, मोहीत येवले, चेतन चौधरी, नितीन पाटील, सागर कोळी, मिलींद देशपांडे, भारती झोपे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. उल्हास पाटील यांनी अनेक बालकांवर सुवर्णप्राशन संस्कार केले. सकाळी १० वाजेपासून सुरू झालेल्या उपक्रमाचा समारोप सायंकाळी ५ वाजता करण्यात आला. दिवसभरात ४५० हून अधिक बालकांवर सुवर्णप्राशन संस्कार करण्यात आले.





### सुवर्णप्राशन संस्कार कुणासाठी आवश्यक?

नवजात बालकांपासून ते १६ वर्षाची मुल-मुली वारंवार आजारी पडत असतील, मुलांची शारीरिक वाढ योग्य प्रमाणात होत नसेल मुलांचे अभ्यासात लक्ष लागत नसेल तर दोन थेंब बाळाला द्या सुवर्णप्राशनाचे, वरदान लाभेल आरोग्य व बौद्धिक विकासाचे बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी हे सुवर्णप्राशन तयार करण्यात आले आहे.

### सुवर्णप्राशनाचे असे आहेत फायदे

बुद्धीमत्ता, स्मरणशक्ती वाढते. रोगप्रतिकारशक्ती वाढते, त्यामुळे बालक वारंवार आजारी पडत नाही. बुद्धी कुशाग्र , तल्लख होते. एकाग्रता वाढून अभ्यासात मन स्थिर होते. शारीरिक विकास योग्य प्रमाणात होतो. मुलांची पचनशक्ती वाढून मुले सुदृढ होतात.

### प्रत्येक महिन्याच्या पुष्य नक्षत्राला होणार संस्कार

गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात प्रत्येक महिन्याच्या पुष्य नक्षत्राच्या दिवशी बालकांवर सुवर्णप्राशन संस्कार करण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी आपल्या बालकांसाठी लाभ घ्यावा असे आवाहन आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातर्फे करण्यात आले आहे.

## संपादकीय

# लोकशाहीची धामधूम

दिवस राज्य विधानसभा निवडणुकीचे आहेत. प्रचाराची धामधूम सुरू झाली आहे. काही दिवसांतच सभा आणि मिरवणुकांनी वातावरण गजबजेल. देशात सतत कुठल्या ना कुठल्या निवडणुका सुरूच असतात. या वातावरणापासून लहान, किंबहुना अडनिड्या वयाच्या मुलांनासुद्धा लांबच ठेवले जाते. एरवी १५-१६ वर्षांच्या मुलाला तू मोठा झाला असे ऐकवले जाते, पण लोकशाही आणि विशेषतः निवडणूक या विषयात त्यांना काय कळते, असाच दृष्टिकोन आढळतो. तथापि सुजाण नागरिक घडण्यासाठी या योग्य वयातच लोकशाही मूल्ये आणि निवडणूक साक्षरतेचे संस्कार होणे आवश्यक आहे. त्यादिशेने सीबीएसई शाळांनी पाऊल टाकले आहे.शाळांमध्ये लोकशाही क्लब स्थापन करून त्यातून उपरोक्त धडे विद्यार्थ्यांना दिले जाणार असल्याचे वृत्त माध्यमांत प्रसिद्ध झाले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या पुढाकाराने नवीन अभ्याक्रमात याचा विचार समाविष्ट आहे. या निर्णयाचे पालकवर्ग स्वागत करील. 'लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांसाठी चालवलेले लोकांचे राज्य' अशी लोकशाहीची ढोबळ व्याख्या मुलांना पाठ असते, पण त्याचा नेमका अर्थ किती विद्यार्थी सांगू शकतील? लोकशाहीत घटनेने देशातील नागरिकांना अनेक मूलभूत अधिकार बहाल केले आहेत. त्यांची कर्तव्येही निश्चित केलेली आहेत. निवडणूक हा लोकशाही सार्थ ठरवण्याचा महत्त्वाचा टप्पा आहे. १८ वर्षे हे मतदानासाठी कायदेशीर वय आहे. युवकांमध्ये मतदानाचा विलक्षण उत्साह आढळतो. लोकशाहीत तो अधिकार किती महत्त्वाचा मानला जातो याची जाणीव त्यांच्यात रुजणे तितकेच महत्त्वाचे आहे. उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे ते शक्य होऊ शकेल. शालेय वयात मुलांना हे शिकवले जायला हवे. त्यातून मुलांचा दृष्टिकोन विशाल होऊ शकेल. लोकशाहीविषयीची त्यांची समज वाढेल. निवडणुकांविषयी त्यांचे ज्ञान बळकट होईल. त्यातूनच मतदान कर्तव्य आणि हा अधिकार निःपक्षपातीपणे पार पाडण्याची प्रेरणा त्यांना मिळू शकेल.सुजाण नागरिक घडण्यासाठी ही प्रक्रिया फार महत्त्वाची आहे. सध्यस्थितीत समाज माध्यमांचा वापर करून लोकांना प्रभावित केले जाते. माध्यमाच्या भाषेत त्याला 'नॅरेटिव्ह सेट' करणे म्हटले जाते. त्या काळात सुजाण नागरिक घडवण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे जाणते मानतात. त्यादृष्टीने सीबीएसई शाळांचे उपक्रम प्रेरणादायी आहेत. सीबीएसई शाळांपर्यंत ते मर्यादित राहू नयेत. त्यांची व्याप्ती सर्व शाळांपर्यंत विस्तारणे आवश्यक आहे.

## आंतरविभागीय खो खो स्पर्धेत विजेतेपद

**जळगाव – येथील गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी डॉ. बाबासाहेब आबेंडकर तंत्रज्ञान विद्यापिठ आयोजित आंतरविभागीय स्पर्धेत यश मिळवले आहे.**

गोदावरी अभियांत्रिकीच्या प्रांगणात संपन्न झालेल्या या स्पर्धेत गोदावरी अभियांत्रिकीच्या महिला खेळाडूंनी खो खो स्पर्धेत विजेतेपद प्राप्त केले. त्यांच्या यशाबददल महाविद्यालयात जल्लोष व्यक्त केला जात आहे. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारीतोषीक वितरण करण्यात आले. खेळाडूना क्रिडा संचालक आसिफ खान यांचे मार्गदर्शन लाभले.यातील १७ खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.





## आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत विजेतेपद

**जळगाव – येथील गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी डॉ. बाबासाहेब आबेंडकर तंत्रज्ञान विद्यापिठ आयोजित आंतरविभागीय स्पर्धेत यश मिळवले आहे.**

गोदावरी अभियांत्रिकीच्या प्रांगणात संपन्न झालेल्या या स्पर्धेत गोदावरी अभियांत्रिकीच्या महिला खेळाडूंनी कबडडी स्पर्धेत विजेतेपद प्राप्त केले. त्यांच्या यशाबददल महाविद्यालयात जल्लोष व्यक्त केला जात आहे. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारीतोषीक वितरण करण्यात आले. खेळाडूना क्रिडा संचालक आसिफ खान यांचे मार्गदर्शन लाभले.यातील १७ खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

## आंतरविभागीय खो खो स्पर्धेत पुरुष संघ उपविजेते

जळगाव - येथील गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी डॉ. बाबासाहेब आबेंडकर तंत्रज्ञान विद्यापिठ आयोजित आंतरविभागीय स्पर्धेत यश मिळवले आहे.

गोदावरी अभियांत्रिकीच्या प्रांगणात संपन्न झालेल्या या स्पर्धेत गोदावरी अभियांत्रिकीच्या पुरूष खेळाडूंनी खो खो स्पर्धेत उपविजेतेपद प्राप्त केले. त्यांच्या यशाबददल महाविद्यालयात जल्लोष व्यक्त केला जात आहे. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारीतोषीक वितरण करण्यात आले. खेळाडूना क्रिडा संचालक आसिफ खान यांचे मार्गदर्शन लाभले.यातील १७ खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. विजेत्या खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष माजी खा.डॉ. उल्हास पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, सदस्या डॉ. केतकीताई पाटील, डी एम कॉर्डीओलॉजीस्ट डॉ.वैभव पाटील आणि प्राचार्य डॉ. व्ही.एच. पाटील यांनी अभिनंदन केले





**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

प्रेमवाणी

3. *Adopt evidence-based practices and standardized protocols.*
– ❋प्रमाण–आधारित प्रथाओं और मानकीकृत प्रोटोकॉल को अपनाएं।❋
4. *Build commitment to innovation and willingness to break new ground.* – ❋नवाचार के प्रति प्रतिबद्धता और नई जमीन तोड़ने की इच्छा विकसित करें।❋
6. *Develop compelling visual identity.*
– ❋आकर्षक दृश्य पहचान विकसित करें।❋
7. *Creating a positive experience accrues direct benefits to quality outcomes.* – ❋सकारात्मक अनुभव बनाना गुणवत्ता परिणामों के लिए प्रत्यक्ष लाभ लाता है।❋

## ऑनलाईन मानसिक आरोग्य जनजागृती सत्रात गोदावरी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

**जळगाव –गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग, जळगाव येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (एमयुएचएस), नाशिकच्या विद्यार्थी कल्याण विभागाद्वारे आयोजित मानसिक आरोग्य जनजागृती सत्रात सहभाग घेतला.**

विद्यापीठाच्या क्लिनिकल सायकोलॉजिस्ट सौ. मानसी हिरे यांच्या नेतृत्वात घेण्यात आलेल्या या सत्रात आरोग्य विज्ञानाच्या विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा ताण आणि त्यावर मात करण्यासाठी मानसिक आरोग्य कसे जपावे याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाढत्या ताणाचा विचार करून, विद्यापीठाने झूम ऑनलाइन बैठकीच्या माध्यमातून मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी टीप्स देतांना ज्यामध्ये ताण प्रभावीपणे कसा हाताळावा यावर भर देण्यात आला आणि मानसिक स्थिरतेसाठी उपयुक्त साधने दिली गेली. महाविद्यालयाच्या ९५ विद्यार्थ्यांनी या सत्रात सहभाग घेतला, ज्यामध्ये ताण प्रभावीपणे कसा हाताळावा यावर भर देण्यात आला आणि मानसिक स्थिरतेसाठी उपयुक्त साधने दिली गेली.




## ५५ व्या वाढदिवसानिमित्त ५५ रक्तदात्याचे रक्तदान

**जळगाव – भूमिपुत्र फाउंडेशनच्या अध्यक्ष व मा जि. प. सदस्य श्री नानाभाऊ महाजन यांच्या ५५ वा वाढदिवस निमित्त खर्ची येथिल ग्रामस्थ व माध्यमिक विद्यालय खर्ची बु यांनी संयुक्त विद्यामानाने महा रक्तदान शिबिराच्या आयोजन केले. यात ५५ रक्तदात्यांनी केले.**

कार्यक्रमाचे उद्घाटन सौ जयश्रीताई महाजन मा जि प सदस्य यांचा हस्ते झाले. कार्यक्रम प्रसंगी ताईसो तृप्ती नानाभाऊ महाजन यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यात नानाभाऊ महाजन यांनी सालाबादप्रमाणे रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजसेवेचा वसा असाच अविरत सुरू राहील असे मत ताईंनी व्यक्त केले .रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल माळी यांनी सविस्तर विचार मांडले.




यावेळी उत्तम इंदा महाजन, नवल महाजन, प्रकाश महाजन सर, चैत्राम मराठे सर, माजी सरपंच गोपाल महाजन, संस्थेचे पदाधिकारी भूरा महाजन, विठ्ठल भाऊ महाजन ,पोलीस पाटील नाना महाजन, शांताराम महाजन, नामदेव चव्हाण, आप्पा म्हस्के, नाना सपकाळे ,प्रा योगेश महाजन सर, हिम्मत महाजन, सुभाष महाजन ,अरुण महाजन , उपसरपंच योगेश चव्हाण, संतोष अहिरे,विनोद मराठे, बापू गवळे,गणेश वाणी, भगवान महाजन व दगा महाजन या सर्व ज्येष्ठ मंडळींनी मोलाचे सहकार्य केले. रक्तदान शिबिरासाठी गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मदाय रुग्णालय रक्तपेढी जळगाव येथील डॉ.नितीन भारंबे,डॉ.अविनाश खुडे रक्तपेढी समन्वयक. लक्ष्मण पाटील, शेख सय्यद सर,भावेश शेळके विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व भूमिपुत्र फाउंडेशनचे मकसूद पटेल ,टाकरखेडा उपसरपंच श्याम पाटील व प्रदीप देशमुख यांनी परिश्रम घेतली.

## एयु स्मॉल फायनान्स बँकेत ३१ दात्यांनी केले रक्तदान

**जळगाव – एयु स्मॉल फायनान्स बँक जळगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यात ३१ दात्यांनी रक्तदान केले**

बँकेचे व्यवस्थापक संजीव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिरात ग्राहक, कर्मचारी यांनी उस्फुर्तपणे रक्तदानासाठी सरसावले. येथील मॅनेजर संजीव गायकवाड यांनी स्वता रक्तदान करत इतरांना प्रोत्साहन दिले. शिबिरात ३१ दात्यांनी रक्तदान केले. यशस्वीतेसाठी गोदावरी फाउंडेशन डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय रक्तपेढी डॉ.नितीन भारंबे. डॉ. अविनाश लुळे, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील. शेख सर, राज तंवत,यांनी परिश्रम घेतले.




Editor : Subhash Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये

# इंडक्शन कम ओरींएन्टेशन कार्यक्रम



**जळगाव – येथील गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग मध्ये बीएस्सी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कम ओरींएन्टेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.**

कार्यक्रमाचे उदघाटन प्राचार्य विशाखा गणविर यांचे हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी प्रशासन अधिकारी प्रविण कोल्हे, प्रा. निम्मी वर्गीस,प्रा सुमैया शेख, प्रा. प्रशिक चव्हाण,प्रा. स्वाती गाडेगोणे, प्रा. अश्लेषा मून, प्रा. स्मीता उभाळे, प्रा. अभिजित राठोड, प्रा शरद आडे, सह प्राध्यापक उपस्थीत होते.मान्यवरांचा सत्कार पुष्पगुच्छ देवून करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करतांना प्राचार्य विशाखा गणविर यांनी उपस्थीत विदयार्थींनीना महाविद्यालयाचे नियम व अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली. प्रा. निम्मी वर्गीस यांनी संस्था परिचय करुन दिला. यानंतर प्रत्येक विभागाच्या प्रमुखांनी प्राध्यापक परिचय व माहिती दिली. प्रा राठोड यांनी नर्सिंगमधील संधी व वाटा विषद केल्यात. माजी विद्यार्थ्यांनी देखिल अनूभव कथन केले. सुत्रसंचालन प्रा स्मीता उभाळे तर आभार प्रा अश्लेषा मून यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा निम्मी वर्गीस यांच्या मार्गदर्शनानुसार बीएस्सी प्रथम वर्षाचे विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# डी-डायमर चाचणी गरज का?

**डी–डायमर चाचणीची काय गरज आहे?**

जर तुम्हाला रक्त गोठण्याच्या स्थितीची चिन्हे असतील, जसे की डीप व्हेन थ्रोम्बोसिस किंवा पल्मोनरी एम्बोलिझम, तुम्हाला या चाचणीची आवश्यकता असू शकते.




**डीप वेन थ्रोम्बोसिस :** या विकारात रक्ताची गुठळी शिरेच्या आत खोलवर तयार होते. या गुठळ्या बहुतेकदा खालच्या पायांवर परिणाम करतात.

**पल्मोनरी एम्बोलिझम :** हा फुफ्फुसाच्या धमनीत अडथळा आहे. जेव्हा शरीराच्या दुसर्या भागात रक्ताची गुठळी फुटते आणि फुफ्फुसात जाते तेव्हा असे होते. डीव्हीटीच्या गुठळ्यांमुळे पीई वारंवार होतो.

**प्रसारित इंट्राव्हास्कुलर कोग्युलेशन:** हा एक असा विकार आहे ज्यामुळे असामान्यपणे मोठ्या प्रमाणात रक्ताच्या गुठळ्या तयार होतात. त्यांच्यात संपूर्ण शरीरात पसरण्याची क्षमता आहे, ज्यामुळे अवयवांचे नुकसान आणि इतर आपत्तीजनक परिणाम होतात. अत्यंत क्लेशकारक अपघात, विशिष्ट संक्रमण किंवा घातकता या सर्वांमुळे होऊ शकते.

**स्ट्रोक :** मेंदूला रक्तपुरवठा खंडित होतो किंवा मेंदूतील रक्तवाहिनी तुटते तेव्हा स्ट्रोक होतो.

**डीव्हीटीचे लक्षणे**

* पाय दुखणे किंवा कोमलता *लेग सूज * लालसरपणा किंवा पायांवर लाल रेषा * झए च्या लक्षणांमध्ये हे समाविष्ट आहे: * श्वास घेण्यासंबंधी समस्या * खोकला *छाती दुखणे * रॅपिड हृदयाचा ठोका.

ही चाचणी प्रयोगशाळेत केली जाते.

## डॉ.उल्हास पाटील विधी महाविद्यालयात फ्रेशर्स पार्टी

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील विधी महाविद्यालयात प्रथम वर्ष एलएलबी व प्रथम वर्ष बीए एलएलबी या विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टी व नवागतांचे स्वागत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

कार्यक्रमासाठी शहरातील प्रसिद्ध विधीज्ञ जी एम पाटील हे उपस्थीत होते. जी एम पाटील यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक सखोल माहिती, वकिली व्यवसायातील बारकावे तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देखील दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. नयना महाजन (झोपे ) या होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी ऋतुजा भिडे ( व्ह सनी कोर व्दीतीय वर्ष लॉ. यांनी केले. विद्यार्थ्यांनी विविध कला गुण दर्शनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.



# गोदावरी स्कूलमध्ये 'सायबर सुरक्षा'वर कार्यशाळा



जळगाव – गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल जळगाव मध्ये विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा याबाबत जागरूक करण्यासाठी आज एक विशेष कार्यशाळा नुकतीच सपन्न झाली. या कार्यशाळेत सायबर गुन्हे, ऑनलाइन सुरक्षा आणि इंटरनेटचा जबाबदारीने वापर,ज्यामध्ये सायबर सुरक्षा तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना विविध सायबर हल्ल्यांचे प्रकार, पासवर्डची सुरक्षा, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याबद्दल माहिती दिली. त्यांनी ऑनलाईन फसवणूक आणि गुप्तता धोके कसे टाळावे या विषयांवर मार्गदर्शन महाराष्ट्र सायबर सुरक्षा पोलीस सचिन सोनवणे यांनी केले.या सोबत तृप्ती अनपढे शाळेच्या प्राचार्य निलीमा चौधरी उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांच्या मनात सायबर सुरक्षा महत्त्वाचे असल्याचे ठसवण्यासाठी अनेक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. कार्यशाळेचे आयोजन शाळेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने केले होते, स्कूलच्या प्राचार्य सौ. नीलिमा चौधरी यांनी या कार्यशाळेचे महत्त्व अधोरेखित करत, डिजिटल युगात सायबर सुरक्षिततेविषयी जागरूकता वाढवणे हे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.शेवटी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात

# पालक शिक्षक सभा उत्साहात संपन्न

**जळगाव – येथील गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालयात नुकतीच पालक शिक्षक सभा संपन्न झाली यात विविध विषयावर मंथन करण्यात आले.**



प्राचार्य विशाखा गणविर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सभेत सर्व सदस्य उपस्थीत होते. सुरूवातीला विद्यार्थी पालक तसेच प्राध्यापकांनी मेणबत्ती लावून दिप प्रज्वलन केले. यानंतर उपस्थीतांचे स्वागत करण्यात आले. प्राचार्य गणविर यांनी वार्षिक अहवाल विषद संस्थाचे नियम व शिस्त तसेच उपक्रमांची माहिती देत पालकांना मागील वर्षीचे घडामोडी तसेच चालू वर्षातील कार्यक्रमाची रूपरेषा समजावून सांगितली. पाल्याच्या प्रगतीसाठी पालकांनी जागरूक राहावे या दृष्टीने देखिल त्यांनी मार्गदर्शन केले. यानंतर पालकांच्या शंकाचे निरसन प्रश्नोत्तरातून करण्यात आले. यावेळी प्राचार्य विशाखा गणविर, प्रशासन अधिकारी प्रविण कोल्हे यांचेसह सर्व प्राध्यापक उपस्थीत होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा अभिजित राठोड व आभार प्रा. अश्लेषा मून यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा निम्मी वर्गीस यांच्या मार्गदर्शनानुसार बीएस्सी प्रथम वर्ष विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ होम सायन्स महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत 'वर्ल्ड फूड डे' साजरा

**जळगाव – डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ होम सायन्स महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'वर्ल्ड फूड डे ' साजरा करण्यात आला.**

ह्या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी गरजू लोकांसाठी पोळी भाजी चे पाकीट तयार करून रेल्वे परिसरातील गरजू लोकांना वाटप केले या कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रा.जयश्री कुळकर्णी,प्रा.तेजस्विनी पाटील, प्रा.रेणुका सूर्यवंशी, प्रा. समृध्दी सराफ उपस्थिती होत्या.




## राष्ट्रीय पातळीवर धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

**सावदा – रावेर तालुक्यातील तांदलवाडी येथील रहिवासी व सावदा येथील डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूलचा सातवीचा विद्यार्थी वृदांत सचिन पाटील याची धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा २० ते २६ ऑक्टोबरदरम्यान होईल.**

जिज्ञासा भारंबे या विद्यार्थिनीची सुद्धा निवड झाली आहे. त्यांनी नुकतेच झालेल्या साउथ झोन सीबीएसई स्टेट लेव्हल धनुर्विद्या स्पर्धेत पुणे येथे सिल्व्हर मेडल मिळवले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी खा.डॉ. उल्हास पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, सदस्या डॉ. केतकीताई पाटील, डी एम कॉर्डीओलॉजीस्ट डॉ.वैभव पाटील आणि प्रिन्सीपल भारती महाजन यांचेसह शाळेतील शिक्षकांनी अभिनंदन केले व शुभेच्छा व्यक्त केल्यात.

# गोदावरी अभियांत्रिकीत आविष्कार २०२५ ची प्रथम फेरी संपन्न

**जळगाव – विद्यार्थ्यांमध्ये संशोधन करण्याची आवड निर्माण व्हावी यासाठी विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली अविष्कार या संशोधन स्पर्धेचे दरवर्षी आयोजन केले जाते.गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अविष्कार २०२५ च्या प्रथम फेरीचे महाविद्यालय स्तरावर आयोजन करण्यात आले होते.**



याप्रसंगी प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांच्यासोबत डॉक्टर हेमंत इंगळे (अधिष्ठाता), डॉक्टर नितीन भोळे (प्रमुख बेसिक सायन्सेस अँड ह्म्यानीटीज), डॉ. अनिल कुमार विश्वकर्मा (प्रमुख, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डाटा सायन्स), प्रा. महेश पाटील (प्रमुख, विद्युत विभाग), प्रा. तुषार कोळी (यंत्र विभाग प्रमुख), प्रा. निलेश वाणी (संगणक विभाग प्रमुख), कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. नेमीचंद सैनी व प्रा. जयश्री पाटील तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व सहभागी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करून सरस्वती पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. नेमीचंद सैनी (अविष्कार समन्वयक) यांनी विद्यार्थ्यांना अविष्कार स्पर्धेबाबत माहिती महेश एच.पाटील यांनी संशोधनाचे महत्त्व समजावून सांगितलेयानंतर प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांना संबोधन करताना विद्यार्थी दशेत असताना संशोधनात्मक काम करणे, तसेच नवनवीन गोष्टी शिकणे गरजेचे ठरते, देशपातळीवर वेगवेगळ्या प्रकारचे संशोधन होत आहेत, अशा प्रकारच्या स्पर्धांच्या माध्यमातूनच विद्यार्थी देशपातळीवरील स्पर्धांसाठी तयार होत असतात असेही त्यांनी नमूद केले. यानंतर सहभागी विद्यार्थ्यांनी त्यांच्या पोस्टर्सचे सादरीकरण पर्यवेक्षकांसमोर केले. पर्यवेक्षक म्हणून प्रा. महेश एच पाटील व प्रा. तुषार कोळी तसेच निरीक्षक म्हणून प्रा. अतुल बर्हाटे यांनी काम पाहिले.

# काविळ झालेल्या शिशुवर फोटोथेरेपीद्वारे उपचार

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील शिशु तज्ज्ञांचे यश

**जळगाव – जिल्ह्यातील एका तालुक्यातील अजय साधवानी यांच्या शिशुला झालेल्या काविळवर फोटोथेरेपीद्वारे करण्यात आलेले उपचार यशस्वी ठरले आहेत.**

याबाबत माहिती अशी की, साधवानी दाम्पत्यास शिशु झाल्याचा प्रचंड आनंद झाला होता. मात्र अवघ्या तिसऱ्याच दिवशी शिशुला काविळ झाला होता. साधारणत: शिशुला होणारा कावीळ हा कमी स्वरूपाचा असतो. मात्र या नवजात शिशुच्या काविळचे प्रमाणे हे १८ पर्यंत पोहोचले होते. त्यामुळे त्याच्या जिवीताला धोका निर्माण झाला होता. त्याला तातडीने डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या एनआयसीयू विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. सुयोग तन्नीवार यांनी शिशुची तपासणी केली.



त्याला तातडीने अतिदक्षता विभागात दाखल करून त्याच्यावर फोटोथेरेपीद्वारे उपचार सुरू करण्यात आले. अवघ्या दोन दिवसात शिशुच्या काविळचे प्रमाण कमी झाले आणि त्याचा जीव वाचला. उपचारासाठी डॉ. ओमश्री गुडे, डॉ. कुशल धांडे, डॉ. चंदाराणी देगूलरकर यांनी सहकार्य केले.

### काय आहे फोटोथेरेपी?

फोटोथेरेपी उपचार पद्धतीमध्ये सूर्यप्रकाशातील किरणांचा वापर त्वचाविकारांसाठी केला जातो. एक विशिष्ट दिवा वापरून त्वचा अल्ट्राव्हायोलेट लाइटच्या लहरींमध्ये उघड केली जाते. यामुळे जीवशास्त्रीय प्रक्रियेस चालना मिळते आणि त्वचेवरील सूज कमी होते आणि त्वचेच्या पेशी खूप लवकर वाढू शकत नाहीत. अशा प्रकारच्या उपचार पद्धतीचा वारंवार उपयोग केल्याने त्वचारोग लवकर बरा होण्यास मदत होते. एक्झेमा (इसब), सोरायसिस, व्हिटिलिगो (कोड), इतर त्वचेचे विकार ज्यामुळे त्वचेला खाज सुटते, त्वचेचा टी-सेल लिम्फोमा- त्वचेच्या कर्करोगाचा एक दुर्मिळ प्रकार अशा प्रकारच्या आजारांवर फोटोथेरेपीद्वारे उपचार करण्यात येतात.


# शरीरातील ऍन्टीबॉडीज तपासले का?

**जळगाव – ऍन्टीबॉडीज ही प्रथिने असतात जी आपल्या शरीरात अवांछित पदार्थ प्रवेश करतात तेव्हा आपले संरक्षण करतात.**

तुमच्या रोगप्रतिकारक प्रणालीद्वारे उत्पादित , प्रतिपिंडे या अवांछित पदार्थांना तुमच्या प्रणालीतून काढून टाकण्यासाठी त्यांना बांधतात. कुठल्याही आजाराशी सामना करण्याकरीता शरीरात रोगप्रतिकारक प्रणाली सशक्त असणे आवश्यक आहे. त्यासाठी आजच डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात तपासणी करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रतिजन हा एक परदेशी पदार्थ आहे जो आपल्या शरीरात प्रवेश करतो. यामध्ये बॅक्टेरिया, विषाणू, बुरशी, ऍलर्जी, विष आणि इतर विविध विषारी पदार्थांचा समावेश असू शकतो. अँटीबॉडी एक प्रथिने आहे जी या प्रतिजनांवर हल्ला करण्यासाठी आणि त्यांच्याशी लढण्यासाठी आपल्या रोगप्रतिकारक प्रणालीद्वारे तयार केली जाते.

यासाठी ऍन्टीबॉडीज तपासणी करणे अत्यंत गरजेचे आहे. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या प्रयोग शाळेत अचूक तपासणी करण्यासाठी आजच संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



# डिप्रेशनवर डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात खात्रीशीर उपचार

## मानसोपचार विभागात समुपदेशनाचीही सुविधा

**जळगाव – 'डिप्रेशन' हा शब्द आपण सध्याच्या काळात अनेकदा ऐकतो. हा आजार मूड डिसऑर्डर प्रकारात मोडतो. एखाद्या व्यक्तीचं/माणसाचं उदास असणं, चिडचिड करणं किंवा त्याच्या आयुष्यावर परिणाम करणाऱ्या, त्याचं नुकसान करणाऱ्या रोजच्या आयुष्यातल्या गोष्टी हे तो व्यक्ती डिप्रेशनमध्ये असल्याचं लक्षण आहे. या डिप्रेशनच्या आजारावर आता डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या मानसोपचार विभागात मोफत आणि खात्रीशीर उपचाराची सुविधा उपलब्ध आहे.**

भारतासारख्या विकसनशील देशात डिप्रेशन ही एक सामान्य गोष्ट आहे. भारतातील तरुणांमध्ये डिप्रेशन ही गोष्ट मोठ्या प्रमाणावर आढळून येते. एका अहवालानुसार १३ ते १५ वयोगटातील प्रत्येकी ४ पैकी एक तरुण डिप्रेशनमध्ये असल्याचे वास्तव समोर आलं आहे.किशोरवयातील मुलांतील डिप्रेशनमध्ये



असलेल्या मुलांच्या या अवस्थेत सगळे आपल्याला कमी लेखतायत, आपल्यावर हसतायत असं वाटतं. कुणाशी या बाबतीत बोलू शकत नाही. आई वडिलांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी असलेला दबाव,शिक्षण आणि करियर यासाठी असलेला दबाव, कौटुंबिक समस्या, नातेसंबंधांमध्ये असलेला तणाव, आपल्याविषयी असलेला न्यूनगंड,एकटेपणा अशी डिप्रेशनची लक्षणे आहेत.

**डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात एक्सपर्टकडून घ्या सल्ला**

डिप्रेशन या आजारावर वेळीच उपचार होणे आवश्यक असते. त्यासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या मानसोपचार विभागात विभागप्रमुख डॉ. मयूर मुठे, डॉ. विलास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञांची टीम कार्यरत आहे. तसेच या विभागामार्फत डिप्रेशन आलेल्या रूग्णांवर योजनेंतर्गत मोफत उपचार केले जात असून त्यांचे समुपदेशन देखिल केले जाते.

**तरी गरजू रूग्णांनी ९३०७६२२६९२ या क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन मानसोपचार विभागातर्फे करण्यात आले आहे.**

# सततचा थकवा हा ठरू शकतो गंभीर आजाराचे लक्षण

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात त्वरीत करा तपासणी

**जळगाव – तासनतास काम करून घरी येऊन बेडवर झोपून जातो. तेव्हा आपण एवढे थकलेले असतो, की उठून बसायचीही ताकद नसते. असे बहुतांश लोकांसोबत होते. शारीरिकरित्या खूप मेहनतीचे काम केल्यानंतर लोकांना थकवा आणि सुस्ती येऊ लागते. मात्र बऱ्याच वेळेस ताप, सर्दी किंवा व्हायरल संसर्गामुळेही एखाद्या व्यक्तीला थकवा येऊ शकतो. पण तुम्हाला कोणत्याही कारणाशिवाय सतत थकल्यासारखे वाटत असेल, सुस्ती येत असेल तर सावध होण्याची गरज आहे. सततचा थकवा हा गंभीर आजाराचे लक्षण ठरू शकतो. त्यासाठी त्वरीत डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.**

खूप शारीरिक श्रम किंवा मेहनत केल्यानंतर एखाद्या व्यक्तीला थकवा येऊ शकतो. असा स्थितीत त्या व्यक्तीच्या अंगात उर्जा किंवा ताकद नसते. ती व्यक्ती एखादे काम नीट करू शकत नाही. तर कधी त्या व्यक्तीला वेदनाही जाणवू शकतात. हा त्रास बऱ्याच काळापासून होत असेल किंवा तुम्ही सिस्टमॅटिक एक्झर्शन इंटॉलरन्स डिसीज या आजाराशी लढा देत असाल, तर तुम्हाला रात्री झोपल्यानंतरही सकाळी-सकाळी



थकवा जाणवू शकतो.बहुतांश प्रकरणात निमिया, नैराश्य, फायब्रोमायल्गिया, किडनी, लिव्हर आणि फुफ्फुसाच्या आजारामुळे थकवा आणि सुस्ती जाणवू शकते. त्याशिवाय व्हायरल आणि संसर्गजन्य आजारांमुळेही असा त्रास होऊ शकतो.

### मधुमेह आणि थकवा

टाइप २ मधुमेहामध्ये रुग्णांना बऱ्याचा वेळा सुस्ती वाटते. त्यांना भूक व तहान जास्त लागते, वारंवार लघवीला जावे लागते आणि त्यांचे वजन झपाट्याने कमी होते. जर तुम्हालाही हा त्रास जाणवत असेल तर वेळीच डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मेडीसीन तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

### रक्ताची कमतरता

रक्ताच्या कमतरतेमुळे शरीरातील अनेक भागांवर व कार्यावर परिणाम होतो. व आपल्याला थकवा व अशक्तपणा जाणवतो. या समस्येने पीडित असलेल्या व्यक्तीला चक्कर येणे, थंडी वाजणे असा त्रास होऊ शकतो.

### व्हायरल अथवा बॅक्टेरियाचा संसर्ग

या परिस्थितीमध्ये व्यक्तीला खूप थकवा, ताप, डोके दुखी तसेच शरीर दुखणे, असा त्रास जाणवतो. हे फ्लू पासून ते एचआयव्ही पर्यंत कुठल्याही संसर्गाचे लक्षण असू शकते.

### कॅन्सर

कर्करोग अथवा कॅन्सर झालेल्या व्यक्तीला थकवा येणे हे सामान्य लक्षण आहे. हा थकवा म्हणजे या आजारावरील उपाचारांचा साईड-इफेक्टही असू शकतो. कॅन्सरमध्ये थकवा आणि सुस्ती जाणवणे ही सामान्य थकव्यासारखी नसते, ते खूप वेदनाकारक असते . त्यामुळे रुग्णाला चालण्या- फिरण्यात खूप त्रास होतो व अशक्तपणा जाणवतो. ही लक्षणे फुफ्फुस, पोट आणि स्तनाचा कर्करोग झालेल्या रुग्णांमध्ये दिसून येतात. अशा परिस्थितीत डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन संभाव्य धोके टाळावे असे आवाहन रूग्णालयातर्फे करण्यात आले आंहे.

# नेत्रपटल सुटण्यावर होईल उपचार

**जळगाव – नेत्रपटल हे संवेदनाक्षम पेशींनी बनलेले असते. प्रकाश आणि प्रतिमा, संवेदना या पेशींमधून नेत्रचेता मार्फत (डोळयाची नस) सरळ मेंदूकडे पोचतात.**

हे नेत्रपटल अतिरक्तदाब आणि मधूमेह या दोन आजारात खराब होते व त्यामुळे अंधुक दिसते. म्हणूनच या दोन्ही आजारात नियमितपणे नेत्रपटलांची तपासणी करावी लागते.डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हभप जगन्नाथ महाराज अंजाळेकर नेत्रालयात नेत्रपटलाची तपासणी आणि उपचार केले जातात. नेत्रपटल आपल्या जागेवरून सुटून डोळयामध्ये सरकण्याचा एक आजार असतो. याला आपण नेत्रपटल सुटणे म्हणतात. नेत्रपटलावरील रक्तवाहिन्यांची वाढ अपूर्ण झालेली असते. जन्मानंतर अपूर्ण वाढ झालेल्या रक्तवाहिन्यांची वाढ होताना ती दोषपूर्ण होते व दोषपूर्ण रक्तवाहिन्यांचे एक जाळे तयार होते. या सदोष रक्तवाहिन्या नेत्रपटलास नैसर्गिक रक्तपुरवठा करू शकत नाहीत व या रक्तवाहिन्यांच्या वाढीमुळे मागचा पडदा निसटू शकतो.

# एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पतर्फे क्रीडा स्पर्धाचा शुभारंभ

**जळगाव – एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यावल तर्फे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रकल्पस्तरीय क्रिडा स्पर्धांचा शुभारंभ २४ऑक्टोबर रोजी करण्यात आला. या स्पर्धा २४ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबर या कालावधीत भुसावळ येथील बियाणी मिलिटरी स्कूल येथे आयोजित केल्या आहेत.**

या स्पर्धांसाठी उपस्थित जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे यांनी क्रिडा ध्वजारोहण करून तसेच सहा. आयुक्त समाजकल्याण योगेश पाटील, जिल्हा क्रिडा अधिकारी रवींद्र नाईक, अरुण पवार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी व बियाणी ग्रुपच्या सचिव डॉ. संगीता बियाणी यांच्या हस्ते क्रिडाज्योत पेटवून स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. आदिवासी थोरपुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

बॅन्ड पथकाच्या तालावर सहभागी संघांच्या खेळाडूंनी संचालन करून मानवंदना दिली. पळासखेडा आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी याप्रसंगी व्हिदमीक योगासने करून उपस्थितांची मने जिंकली.




एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यावल अंतर्गत असलेल्या १७ शासकीय आश्रमशाळा व ३२ अनुदानित आश्रमशाळांमधील सुमारे १४०० खेळाडू विद्यार्थी/विद्यार्थिनींनी या स्पर्धांत सहभाग घेतला आहे. खो-खो,कबड्डी, अॅथेलेटिक्स, व्हॉलीबॉल, हँडबॉल यासारखे विविध खेळ प्रकारांसाठी या स्पर्धा होत आहेत.

जन्मतः विविध खेळ गूण अंगी बाळगणाऱ्या अतिदुर्गम भागातील आदिवासी खेळाडू विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी प्रकल्पस्तरीय क्रिडा स्पर्धाचा मोलाचा वाटा आहे. याठिकाणी सांघिक व वैयक्तिक खेळात विजेत्या खेळाडूंनी विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेत देखील जास्तीत जास्त पदके जिंकून यावल प्रकल्पाचे नावलौकिक राखावे असे उद्गार प्रकल्प अधिकारी श्री. अरुण पवार यांनी उद्घाटन प्रसंगी काढले.

# निवडणूक सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करण्याची मिळणार सुविधा

**जळगाव – सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जळगाव शहर विधानसभा मतदार संघाकरीता २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणुकीच्या दिवशी जे अधिकारी कर्मचारी अत्यावश्यक सेवेत आहेत अशा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडील मतदानापूर्वी टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**

ज्यामध्ये अत्यावश्यक सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे टपाली मतदान करुन घेण्याच्या नियोजनासाठी त्या कर्मचाऱ्यांचे फॉर्म नं. १२ ड भरून घेणे , त्यांच्यासाठी टपाली मतदान केंद्र उभारणे इत्यादी या बाबींचा सामावेश आहे. तरी सर्व कर्मचाऱ्यांना एक नोडल अधिकारी नेमून माहितीसह त्यांना या कार्यालयास २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी




५.०० वाजता आढावा सभेला उपस्थित राहण्याच्या सुचना कराव्यात आणि त्यांच्यासोबत नोडल अधिकारी नियुक्ती आदेशाची प्रत पाठवावी. तसेच किती आपल्या अधिनस्त किती कर्मचाऱ्यांना ही सुविधी हवी आहे ? यांच्या लेखी माहितीसह त्यांना पाठवावे जेणेकरुन या विषयाचे नियोजन करणे सुलभ होईल अशा सुचना उपविभागीय अधिकारी जळगाव तथा निवडणूक निर्णय अधिकारी विनय गोसावी यांनी दिल्या आहेत.